# तुमच्या बचतीचे-गुंतवणुकीचे पैसे स्वजनांना द्यायचे की सरकारला?

**बँक ठेव (डिपॉझिट), म्युच्युअल फंड, शेअर डिमॅट खाते इत्यादीसारख्या बचत आणि गुंतवणूक साधनांमध्ये वारसाची नियुक्ती अनिवार्य करण्यात आली आहे, ज्याचे पालन करण्याची अंतिम तारीख 30 सप्टेंबर होती, जी सरकारने आता 30 जून 2024 पर्यंत वाढवली आहे, या नियमाचे पालन करणे हा या सगळ्याचा सार आहे. सध्या ज्या लाखो लोकांचे पैसे दाव्याविना अडकले (अनक्लेम्ड) आहेत, त्यांच्यासाठी सरकारने ऑनलाइन दावा करण्याची संधी देऊ केली आहे, जरी दावा यशस्वी होण्याचे प्रमाण खूप कमी असले, तरी सुद्धा ते समजून घेणे शहाणपणाचे आहे.**

आपणांस माहित आहे की सरकारकडे लोकांचा, विशेषत: बचतकर्ता-गुंतवणूकदारांचा किती अब्जावधींचा (दावा न केलेला) पैसा पडून आहे, हे अशा लोकांचे पैसे आहेत ज्यांच्या मृत्यूनंतर कुणालाही या पैशाची माहिती नव्हती किंवा असे लोक त्यांच्या नातेवाईकांना न कळवता किंवा मृत्यूपत्र न बनवताच निघून गेले आहेत. परिणामी, त्यांच्या हक्काच्या वारसांना-नातेवाईकांनाही याचा लाभ मिळाला नाही, याशिवाय या वर्गात लाखो लोक जिवंत आहेत, ज्यांनी कालांतराने आपले निवासस्थान बदलले आणि त्यांना लाभांशाचे धनादेश मिळू शकले नाहीत, किंवा विशिष्ट कालमर्यादेत धनादेश जमा करता आले नाहीत. अनेकजण बँकेची एफडीही विसरले. अशाप्रकारे, लाखो बचतकर्ते-गुंतवणूकदार विविध कारणांमुळे त्यांचे पैसे काही साधनांमध्ये-योजनांमध्ये गुंतवल्यानंतर विसरले किंवा ते काढण्यात अयशस्वी झाले किंवा ते एखाद्याच्या नावावर करायचे विसरून गेले.

**लाखो लोकांचे कोट्यावधी रुपये**

एका अंदाजानुसार, म्युच्युअल फंडातील 2600 कोटींहून अधिक रक्कम, विम्यामध्ये 20-22 हजार कोटी रु., बँक ठेवींमधील 35 हजार कोटीं रुपयांवर दावा केलेला नाही (अनक्लेम्ड) आहे. याशिवाय कंपन्यांचे शेअर्स आणि डिव्हिडंड, कोट्यवधी रुपयांचा भविष्य निर्वाह निधी सुद्धा दावा न केल्यामुळे पडून आहे. या सर्वांचे कारण एकच की या सर्व बचत-गुंतवणुकीत एकही नॉमिनी किंवा कायदेशीर वारस ठेवला गेला नाही. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, सरकारने नंतर अनेक पावले उचलली आहेत, जसे की शेअरहोल्डरच्या बँक खात्यात थेट लाभांशाची रक्कम जमा करणे, बँकेनेच मॅच्युरिटीच्या वेळी मॅसेज करून बँक एफडीची आठवण करून देणे इत्यादि. मात्र मूळ अडचण अशी आहे की त्यावेळी या बचतकर्ता-गुंतवणूकदारांनी त्यांच्यानंतर ही रक्कम कोणाला मिळणार याची ठोस व्यवस्था केली नाही. अजूनही

मृत्युपत्र करण्याबाबत आपल्या समाजात पुरेशी दक्षता नाही. काही काळापूर्वी सरकारने प्रत्येक बचत-गुंतवणुकीसाठी नॉमिनी असणे बंधनकारक करून आपली मोहीम सुरू केली होती आणि या सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस त्याचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले होते, या मुदतीच्या आत पालन न करणाऱ्यांचे खाते निलंबित किंवा गोठवले जाईल, अशी सूचना करण्यात आली होती. तथापि आता ही मुदत 30 जून 2024 पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**उपायाकरिता वेबसाइट**

गुंतवणुकीच्या विविध साधनांमध्ये किंवा योजनांमधील साधनांमध्ये (बहुधा सात वर्षांपर्यंत) दावा न केलेला पैसा अखेरीस गुंतवणूकदार शिक्षण आणि जागरूकता उपक्रमांमध्ये वापरण्यासाठी सरकारद्वारे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (इन्व्हेस्टर्स एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड) मध्ये हस्तांतरित केला जातो. त्यावर दावा करण्यासाठी सरकारने देऊ केलेल्या संधीमध्ये, त्याचे दावेदार ऑनलाइन दावे दाखल करू शकतात. यासाठी एक विशेष वेबसाइट स्थापन करण्यात आली आहे , जीचे नाव आहे www.iepf.gov.in.

**प्रक्रिया सोपी की कठीण**

माहिती देणाऱ्यांचे म्हणणे आहे की दावा करण्याची ही प्रक्रिया खूपच मोठी आणि गोंधळात टाकणारी आहे, कारण स्वतःला खरा दावेदार म्हणून सिद्ध करणे सोपे नाही. अर्थात, काही विभागांनुसार हे काम महिना ते वर्षभरात पूर्ण होते. हे काम पार पाडण्यासाठी कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने आयईपीएफ प्राधिकरणांची स्थापना केली आहे. यासाठी अर्ज केल्यानंतर अधिकाऱ्यांनी दावेदारांकडून तसेच कंपन्या-बँका किंवा इतर संस्थांकडून मागवलेल्या विशिष्ट स्पष्टीकरणांमध्ये बराच वेळ जातो.

**स्वागतार्ह पाऊल**

असे असले तरी, वारस हा खरा लाभार्थी (बेनिफिशियरी) नसतो, परंतु वारस असल्याने बचत किंवा गुंतवणूक बिनदावेदार नसते. उलट त्याला नॉमिनीचे संरक्षण मिळते. याशिवाय, भारतीय रिझर्व्ह बँकेने उचललेले एक स्वागतार्ह पाऊल आपण ध्यानात घेतले पाहिजे.

आरबीआय ने अलीकडेच एक केंद्रीकृत वेब पोर्टल उदगम (UDGAM- अनक्लेम डिपॉझिट्स-गेट वे टू ऍक्सेस इन्फॉर्मेशन) लॉंच केले आहे, या पोर्टलवर एखादी व्यक्ती एकाच ठिकाणाहून स्वतःच्या ठेवींमध्ये प्रवेश करू शकते. कुटुंबातील सदस्य विविध बँकांमधील कुटुंबाच्या दावा न केलेल्या ठेवी आणि बचत खाती शोधू शकतात. यामुळे कमीत कमी बँक ठेवींवर दावा करण्याची समस्या कमी तरी होईल. इतर गुंतवणूक संस्थांनीही अशाच प्रकारच्या उपाययोजना केल्या पाहिजेत. खरे तर दावा न केलेली समस्या दूर करण्यासाठी आपण स्वतःच ठोस उपाय योजला पाहिजे.